।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि २० जुलै २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३० वा


## डॉ. बसवेश्वर पाटील यांच्या पाटील बालरुग्णालय हॉस्पिटल मध्ये महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्ययोजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतुन मोफत उपचार



सांगोला: डॉ. बसवेश्वर पाटील यांच्या पाटील हॉस्पिटल बालरुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजना, बांधकाम कामगार योजना, राज्य शासन कर्मचारी योजना सुरू झाली आहे. आता नागरीकांना या योजनेअंतर्गत मोफत उपचार मिळणार असून केसरी, पिवळे व पांढरे रेशनकार्ड असणाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार असल्याची माहिती डॉ. बसवेश्वर पाटील यांनी दिली.

डॉ. बसवेश्वर पाटील यांचे सांगोला शहरात गेल्या आठ वर्षापासून सर्व सोयी सुविधा युक्त असे बालरुग्णालय सुरू आहे. डॉक्टर बसवेश्वर उत्तम पाटील हे एम.बी.बी.एस. एम.डी. बालरोग तज्ञ म्हणून काम पाहत आहेत. डी.पी.यू पुणे येथून २०१० साली एम.बी.बी.एस. चे शिक्षण पूर्ण केले असून पदव्युत्तर एम. डी. चे शिक्षण के. आय.एम. एस. कराड येथून २०१४ साली पूर्ण केले आहे.

डॉ.बसवेश्वर उत्तम पाटील हे नवजात अत्याधुनिक जीवन समर्थन (छ–डड) आणि बालक अत्याधुनिक जीवन समर्थन (झ–डड) सर्टिफाईड डॉक्टर आहेत.त्यानंतर पुणे येथील सिंहगड इन्स्टिटयूट च्या नवले मेडिकल कॉलेजमध्ये दोन वर्षे असिस्टंट प्रोफेसर या पदावरती काम केले आहे तसेच रुग्णांची ही सेवा केली आहे. त्यानंतर ते अश्विनी मेडिकल कॉलेज हॉस्पिटल, सोलापूर येथे असिस्टंट प्रोफेसर या पदावर काम करत आहेत. डॉक्टर बसवेश्वर पाटील यांनी क्लिनिको एटियॉलॉजिकल स्टडी ऑफ नीओनेट्ल् सीझर्स या विषयावरती संशोधन करून तो प्रबंध आंतरराष्ट्रीय मासिकांमध्ये प्रसिद्ध केला आहे.

डॉ.बसवेश्वर पाटील यांच्या पाटील हॉस्पिटल बालरुग्णालय येथे सध्या एन.आय. सी.यु विभाग सुरू असून यामध्ये कमी दिवसाच्या, कमी वजनाच्या बाळावर, कावीळ असलेल्या, जन्मता न रडलेल्या बाळांवर उपचार केले जातात. सुसज्ज व सर्व सुविधायुक्त असा पी.आय.सी.यू हा विभाग असून यामध्ये झटके येणाऱ्या, सर्पदंश, विषबाधा, बेशुद्ध झालेल्या बाळांवरती उपचार केले जातात. वय वर्ष झिरो (०) ते अठरा(१८) वर्षापर्यंत सर्व मुलांवरती उपचार तसेच सर्व प्रकारचे लसीकरण सुद्धा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत.

# रखडलेल्या महात्मा फुले चौक-भोपळे रोड रस्त्याचे अखेर डांबरीकरण

## आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे व्यापारी बांधवाने मानले आभार



सांगोला : नागरिकांच्या वारंवार तक्रारी असूनही बराच काळ रखडलेल्या सांगोला शहरातील महात्मा फुले चौक ते भोपळे रोड रस्त्याचे डांबरीकरण अखेर करण्यात आले. व्यापारी व नागरिकांच्या सततच्या मागणीमुळे कर्तव्यदक्ष आमदार डॉ. भाई बाबासाहेब देशमुख यांनी २० जून व २८ जून रोजी अशा दोनवेळा बैठका घेऊन प्रशासन व ठेकेदार यांच्यात समन्वय साधत कोणत्याही परिस्थीत हे काम पूर्ण कराच असे सांगितल्यामुळे ठेकेदारास हे काम करणे भाग पडले.त्यामुळे व्यापारी बांधवासह नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. बंदिस्त गटार योजनेच्या ठेकेदाराकडून रस्ता खणून पाइपलाइन टाकल्यानंतर केवळ खडीकरण केले होते. गेल्या महिनाभरापासून या परिसरातील नागरिक, व्यापारी, विद्यार्थी आणि वाहनधारकांना खडतर प्रवासाचा सामना करावा लागत होता. परिसरातील व्यापारी बांधवांनी याबाबत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची भेट घेऊन संबंधित रस्त्याचे डांबरीकरण करावे अशी मागणी केली होती. या मागणीची दाखल घेत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी अधिकारी व ठेकेदार यांच्या समवेत बैठक घेऊन पावसाळा सुरू होण्याअगोदर रस्त्याचे डांबरीकरण करा अशी सक्त सूचना केली होती.

भुयारी गटार योजनेसाठी ठेकेदाराने जेसीबी व पोकलेनच्या सहाय्याने पाइपलाइनचे काम सुरू केले होते. पाइप टाकल्यानंतर रस्त्यावर खडी टाकून ठेवली होती, मात्र रोलिंग केल्यानंतरही डांबरीकरण न झाल्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणी येत होत्या.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी यासंदर्भात दोन वेळा बैठका घेऊन तातडीने हा रस्ता डांबरीकरण करून वाहतुकीसाठी खुला करावा असा सूचना दिल्या होत्या. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सूचनेनंतर कामाला वेग आला आणि नागरिकांच्या मागणीनुसार संपूर्ण रस्ता सुरळीत वाहतुकीसाठी सज्ज करण्यात आला असल्यामुळे व्यापारी बांधवासह नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. नव्या डांबरीकरणाच्या कामामुळे महात्मा फुले चौक, भोपळे रोड व परिसरातील व्यापारी, नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# महिला बचत गटांच्या पाठीशी कायम नगरपरिषद प्रशासन-मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी

## सोनचिरीया उपजीविका केंद्राचा व्दितीय वर्धापन दिन उत्साहात संपन्न




सांगोला : सांगोला नगरपरिषद अंतर्गत दिनदयाळ अंत्योदय योजना (शहरी) व अंगीकृत कर्तव्य शहरस्तर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सोनचिरीया शहर उपजीविका केंद्राचा व्दितीय वर्धापन दिन व वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिभवन, सांगोला येथे उत्साहात पार पडली. सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी मनोगत व्यक्त करत महिलांच्या बचत गटांना कोणतीही अडचण येऊ न देता नगरपरिषद त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असा विश्वास दिला. या कार्यक्रमात विनोदवीर अशोक देशमुख यांनी आनंदी जीवनाची गुरुकिल्ली या विषयावर महिलांसाठी प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांनी महिलांनी रोजच्या जीवनात योगसाधना किती वेळा करावी, आहारात कोणते बदल करावेत, तसेच घरगुती जीवनात आनंदी कसे राहावे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात महिलांसाठी लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांना बक्षिसे डॉ. सुधीर गवळी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी तालुक्यातील विविध महिला बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिलांनी विविध प्रकारचे खाद्यपदार्थांचे स्टॉलही लावले होते, ज्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमास सचिन पाडे ,योगेश गंगाधरे, प्रियंका पाटील मॅडम, अस्मिता निकम मॅडम, श्री.हाके यांच्यासह सांगोला नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अवघ्या २४ तासांत शेळी चोरी गुन्ह्यातील आरोपीस मुद्देमालासह घेतले ताब्यात

सांगोला : सांगोला तालुक्यातील लक्ष्मीनगर येथील रहिवासी सलीम दादा मुजावर यांच्या शेळ्या चोरीचा तपास सांगोला पोलिसांनी अवघ्या २४ तासांत लावला आहे. चोरीस गेलेला सुमारे तीन लाख ३० हजार रुपये किमतीच्या शेळ्या ताब्यात घेऊन एका आरोपीस अटक केली आहे. सांगोला पोलिसांच्या या तत्पर, तांत्रिक व कौशल्यपूर्ण तपासामुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

फिर्यादी सलीम दादा मुजावर (रा. लक्ष्मी नगर, ता. सांगोला) यांच्याकडे मो. नजीर शेख (रा. बिहार) हा शेळ्या राखण्यासाठी त्यांच्याकडे कामास होता. नजीर शेख मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास सलीम मुजावर यांच्या शेळ्या चरण्यासाठी रानात घेऊन गेला होता. सायंकाळी चार वाजले तरीही नजीर शेख हा शेळ्या घेऊन घरी परत आला नाही व त्याचा मोबाईलही स्विच ऑफ होता. सलीम मुजावर यांनी सर्वत्र शेळ्यांचा शोध घेतला परंतु त्या मिळून आल्या नाहीत. त्यामुळे सलीम मुजावर यांचा नजीर शेख यानेच शेळ्या चोरून नेल्या असाव्यात असा संशय होता. याबाबत बुधवारी सलीम मुजावर यांनी सांगोला पोलीस ठाण्यात शेळ्या चोरीबाबत फिर्याद दाखल केली होती. या गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी सांगोला पोलीस ठाण्याने तत्काळ तपासकार्य हाती घेतले. पोलीस कॉन्स्टेबल शहाजान शेख, बिपिन ढेरे व नवनाथ माने यांनी तांत्रिक विश्लेषण व सोलापूर सायबर शाखेच्या मदतीने वेगवान तपास सुरू केला. आरोपी चोरी केलेल्या शेळ्या एका वाहनामधून घेऊन मुंबईकडे जात आहेत.

पोलिसांना गुरुवारी समजले की, आरोपी मुंबईजवळील वसई–विरार जवळील नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार स्थानिक पोलीस ठाण्याचे अझरुद्दीन मस्ते यांच्या सहकार्याने पोलीस कॉन्स्टेबल शहाजहान शेख, बिपिन ढेरे, नवनाथ माने यांनी दबा धरून शेळ्या घेऊन जाणारे वाहन पकडून आरोपीस ताब्यात घेतले. पिकअपमधील शेळ्या, पाट व बोकड असा सुमारे तीन लाख तीस हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नजीर शेख यास ताब्यात घेतले आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, पोलीस उपअधीक्षक विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बिपिनचंद्र ढेरे, पोलीस हवा. नवनाथ माने, पो. कॉ. शहाजहान शेख, सायबर शाखेचे पो. हवा. जुबेर तांबोळी यांनी केली.

# संपादकीय......


जुने वर्ष-४२ वे

अंक-३४ वा


## एसआयआर-बिहार आणि निवडणूक आयोग

बिहारमध्ये निवडणूक आयोगाच्या विशेष सघन सुधारणा नेहरू आणि पटेल यांच्या नागरिकत्वावरील प्रबुद्ध विचारांचे उल्लंघन करतात.२८ एप्रिल १९४७ रोजी, भारताच्या स्वातंत्र्याच्या जवळजवळ तीन महिने आधी, पंतप्रधान जवाहरलाल नेहरू संविधान सभेत नागरिकत्वाच्या मुद्द्यावर बोलताना म्हणाले होते, कदाचित लवकरच असा काळ येईल जेव्हा कोणत्याही व्यक्तीसाठी, मग तो शासक असो किंवा इतर कोणीही, स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक असणे आणि इतर कोणत्याही नावाने किंवा पदवीने संबोधले जाणार नाही, हा सर्वोच्च सन्मान आणि विशेषाधिकार असेल.

एक दिवसानंतर, २९ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत मूलभूत हक्कांवरील अंतरिम अहवालावरील चर्चेला उत्तर देताना सरदार पटेल अतिशय विचारपूर्वक म्हणाले, नागरिकत्वाबाबतच्या तरतुदीची जगभरात छाननी केली जाईल हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. आपण काय करत आहोत यावर ते लक्ष ठेवून आहेत... म्हणून, या मूलभूत हक्कांअंतर्गत आपली सर्वसाधारण प्रस्तावना किंवा नागरिकत्वाचा सामान्य अधिकार इतका व्यापक असावा की जो कोणी आपले कायदे वाचतो तो आपण एक प्रबुद्ध आधुनिक सभ्य दृष्टिकोन घेतला आहे याशिवाय दुसरा कोणताही दृष्टिकोन घेऊ शकत नाही.

भारताचा नागरिक असण्यापासून कोणत्याही संस्थेला मिळणारा सर्वोच्च सन्मान आणि विशेषाधिकार हे नेहरूंचे शब्द किंवा आपला नागरिकत्वाचा अधिकार एका प्रबुद्ध आधुनिक सभ्य दृष्टिकोनात अंतर्भूत असावा असे पटेल यांचे विधान हे नागरिकत्वाच्या हक्कांच्या सातत्यतेशी संबंधित संविधानाच्या कलम १० मध्ये प्रतिबिंबित झाले. त्यात म्हटले आहे की, या भागाच्या वरील कोणत्याही तरतुदींनुसार भारताचा नागरिक असलेला किंवा मानला जाणारा प्रत्येक व्यक्ती, संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहून, असा नागरिक राहील. १९४७ मध्ये नेहरू आणि पटेल यांनी केलेले ते विधान आणि कलम १० अंतर्गत भारताचे नागरिक असलेल्या किंवा मानले जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे नागरिकत्व चालू ठेवणे हे २०२५ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाने २५ जून रोजी सुरू केलेल्या मतदार यादीच्या विशेष सघन सुधारणा (एसआयआर) संदर्भात खूप प्रासंगिक ठरते. २००३ च्या मतदार यादीत समाविष्ट नसलेल्यांना कागदोपत्री पुरावे द्यावे लागतील असा त्यांचा आदेश होता, ज्यामुळे इतर गोष्टींबरोबरच, त्यांची आणि त्यांच्या पालकांची भारताची नागरिक म्हणून स्थिती निश्चित होईल. एउरख ने सूचीबद्ध केलेले असे पुरावे आणि इतर कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्यांना संशयित परदेशी नागरिक म्हणून नागरिक न्यायाधिकरणाकडे पाठवता येईल. १० जुलै रोजी बिहारमध्ये एसआयआर ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी केली आणि एउरख ला विचारले की राज्यातील मतदार यादीच्या पुनरावृत्तीसाठी लोकांचे आधार कार्ड का विचारात घेतले जात नाही, तेव्हा त्यांनी अतिशय धक्कादायक उत्तर दिले की आधार कार्ड भारताचा नागरिक कोण आहे हे ठरवत नाही. भारताचा नागरिक कोण आहे हे निश्चित करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही आणि हे करणे हे केंद्रीय गृहमंत्रालयाचे काम आहे, या सर्वोच्च न्यायालयाच्या आणखी एका प्रश्नावर, निवडणूक आयोगाने शांतता पाळली. आता तेलुगू देसम पक्षाने (टीडीपी) बिहारमधील निवडणूकपूर्व मतदार यादीच्या सुरू असलेल्या विशेष सघन सुधारणा (एसआयआर) वर प्रश्न उपस्थित केले आहेत आणि म्हटले आहे की, एसआयआरची व्याप्ती स्पष्टपणे परिभाषित केली पाहिजे आणि ती मतदार यादी पुनर्दुरुस्ती आणि समावेशनापुरती मर्यादित असली पाहिजे. हे स्पष्टपणे कळवले पाहिजे की ही प्रक्रिया नागरिकत्व पडताळणीशी संबंधित नाही आणि कोणत्याही फील्ड सूचनांमध्ये हा फरक प्रतिबिंबित झाला पाहिजे. त्यात समावेशीकरणाची गृहीतकता असण्याची मागणी करण्यात आली आहे, आणि मागील पुनरावृत्तीनंतर नोंदणी केलेल्या मतदारांना विशिष्ट आणि पडताळणीयोग्य कारणे नोंदवली जात नाहीत तोपर्यंत त्यांची पात्रता पुन्हा स्थापित करण्याची आवश्यकता नसावी आणि विसंगती ओळखण्यासाठी कॅग अंतर्गत तृतीय पक्ष ऑडिट करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला देत, टीडीपीने असे प्रतिपादन केले की मतदार यादीमध्ये एखाद्या व्यक्तीचा पूर्वी समावेश केल्याने वैधतेचा गृहीतक निर्माण होतो आणि कोणत्याही वगळण्यापूर्वी वैध चौकशी केली पाहिजे. पुराव्याचे ओझे मतदारावर नाही तर ईआरओ किंवा आक्षेप घेणाऱ्यावर आहे, विशेषतः जेव्हा अधिकृत यादीत नाव असेल तेव्हा, असे त्यात म्हटले आहे.

बिहारमध्ये एसआयआर सुरू झाल्यानंतर टीडीपीने उपस्थित केलेले आणि नागरी समाज संघटनांनी अनेकदा विचारलेले प्रश्न नागरिकत्वाच्या मुद्द्यावरील पटेल यांच्या उदारमतवादी आणि प्रबुद्ध विचारांमध्ये आणि वर म्हटल्याप्रमाणे, संविधानाच्या कलम १० मध्ये नागरिकत्वाच्या हक्कांचे पालन करणे अनिवार्य केले आहे. ज्या भारतीयांकडे निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदार ओळखपत्र आहे ते भारताचे नागरिक मानले जातात. कलम १० नुसार अशा नागरिकांना भारताचे नागरिक म्हणून त्यांची ओळख सिद्ध करण्यासाठी कोणत्याही पुराव्याचा भार न लादता नागरिकत्वाचे अधिकार मिळण्याचा अधिकार आहे. २००३ नंतर बिहारमध्ये मतदार म्हणून नोंदणीकृत असलेल्यांसाठी मतदार ओळखपत्रे वैध नाहीत असा निवडणूक आयोगाचा आग्रह नागरिकत्वाच्या हक्कांचे पालन करण्याची हमी देणाऱ्या संविधानाच्या आणि सरदार पटेलांच्या उदारमतवादी आणि प्रबुद्ध विचारांच्या विरोधात आहे.

## नॉलेज वार्ता

### जिज्ञासेमुळे आइन्स्टाईन महान शास्त्रज्ञ बनले; प्रत्येक महान शोधामागे जिज्ञासा असते

हजारो लोकांनी झाडावरून पडणारे सफरचंद पाहिले असेल, पण ते सर्वांसाठी सामान्य गोष्ट होती. जेव्हा न्यूटनने हे पाहिले तेव्हा त्याच्या मनात एक प्रश्न निर्माण झाला - सफरचंद खाली का पडते आणि वर का जात नाही? या प्रश्नाला जिज्ञासा किंवा कुतूहल म्हणतात. सर्वात मोठे शोध कुतूहलाने सुरू होतात, काहीतरी जाणून घेण्याची, समजून घेण्याची आणि विचार करण्याची इच्छा. गुरुत्वाकर्षणाच्या या शोधाने विश्व समजून घेण्याची व्याख्या बदलली. असे नाही की न्यूटन लहानपणापासूनच खूप हुशार होता, किंवा तो एखाद्या विशेष शाळेत शिकत असे. तो एक सामान्य विद्यार्थी होता, जो अनेकदा त्याच्या स्वतःच्या जगात हरवून जायचा. जर त्याला कशाने खास बनवले असेल तर ते कुतूहल होते. त्याला सर्वकाही जाणून घेण्याची, समजून घेण्याची आणि खोलवर एक्सप्लोर करण्याची तीव्र भूक होती.

कुतूहल ही ती आग आहे जी तुम्हाला थांबू देत नाही. तुमच्या मनात वारंवार येणारा तो प्रश्न - हे कसे घडले? हे का घडले? काहीतरी नवीन शिकण्याचा प्रवास अशा प्रश्नांपासून सुरू होतो.

जिज्ञासा म्हणजे काय?

जिज्ञासा किंवा कुतूहल ही अशी भूक आहे जी तुमच्या मनाला शांत राहू देत नाही. तो छोटासा प्रश्न - हे का घडले? किंवा यामागे काय आहे? - जो तुम्हाला उत्तर शोधण्यास भाग पाडतो. लहानपणी आपण सर्वजण उत्सुक असतो. आठवते जेव्हा तुम्ही आकाशाकडे पाहून विचारायचे, तिथे चंद्र कसा लटकत आहे? किंवा पावसाकडे पाहून विचारायचे, वरून पाणी कसे येते? आपण मोठे झाल्यावर हे प्रश्न कुठेतरी हरवून जातात.

कुतूहल म्हणजे फक्त प्रश्न विचारणे नव्हे तर उत्तरांच्या शोधात एक पाऊल पुढे जाणे. ही अशी जादू आहे जी तुम्हाला पुस्तके, लोक आणि अनुभवांमधून काहीतरी नवीन शिकायला लावते.

जिज्ञासा का महत्त्वाची आहे?

कल्पना करा जर आइन्स्टाईनने प्रश्न विचारले नसते तर काय झाले असते? किंवा स्टीव्ह जॉब्सने फोन अधिक स्मार्ट कसे बनवायचे याचा विचार केला नसता तर? कुतूहल ही एक ठिणगी आहे जी नवीन कल्पनांना जन्म देते. ती तुम्हाला चांगले बनवते आणि त्याचे मोठे फायदे येथे आहेत:

जेव्हा आपण उत्सुक असतो तेव्हा आपल्याला शिकणे हे ओझे वाटत नाही. आपण एखादे पुस्तक उघडतो, गुगल करतो किंवा एखाद्याला विचारतो कारण आपल्याला फक्त उत्तर हवे असते. कधीकधी आपण एका बैठकीत संपूर्ण पुस्तक वाचतो कारण आपल्याला कथेचा शेवट जाणून घेण्याची उत्सुकता असते.

नवीन गोष्टी विचार करण्याची शक्ति देते,प्रत्येक महान शोधाची सुरुवात एका प्रश्नाने होते. थॉमस अल्वा एडिसनने बल्ब तयार केला कारण तो विचार करत होता की, रात्री प्रकाश कसा असू शकतो? कुतूहल आपल्याला चौकटीबाहेर विचार करण्याचे धाडस देते.बदलाची ठिणगी निर्माण करते,

कुतूहल तुम्हाला नेहमीच्या विचारसरणीतून बाहेर काढते. जर तुम्ही दररोज तेच काम केले तर आयुष्य त्याच पद्धतीने पुढे जाते. जर तुमच्या मनात हा प्रश्न आला - मी काहीतरी वेगळे करू शकतो का? तर सर्वकाही बदलू लागते.मन तंदुरुस्त ठेवते.

कुतूहल आपले मन सक्रिय ठेवते. ते तुम्हाला कंटाळवाणेपणा आणि तणावापासून वाचवते. अभ्यास असे म्हणतात की जिज्ञासू लोक मानसिकदृष्ट्या अधिक निरोगी असतात.

आता प्रश्न असा आहे की तुमच्या आयुष्यात उत्सुकता कशी आणायची? येथे ५ सोप्या टिप्स आहेत:

प्रश्न विचारणे थांबवू नका.बालपणीची ती सवय पुन्हा अंगीकार. प्रत्येक गोष्टीमागील 'का' शोधा.

दररोज काहीतरी नवीन शिका, जसे की एखादा नवीन शब्द, एखादी नवीन वस्तुस्थिती किंवा एखादी नवीन कौशल्य - फक्त सुरुवात करा.

नवीन ठिकाणांना भेट द्या, नवीन लोकांना भेटा. प्रत्येक भेट एक नवीन प्रश्न घेऊन येते. प्रवास करा, गप्पा मारा.कधीही अपयशाला घाबरू नका. प्रत्येक चुकीत एक धडा लपलेला असतो. तो शोधा.तुमच्या सभोवतालच्या गोष्टींकडे बारकाईने पहा. तुमच्या सभोवतालचे जग प्रश्नांनी भरलेले आहे. ते एक्सप्लोर करा.

## सुविचार

**आयुष्यात कुठल्याही परीस्थितीत सुखी राहण्याचा प्रयत्न करा,दुःखी राहिल्याने उद्याचे प्रॉब्लेम सुटणार नाहीयेत उलट आजचे सुख सुद्धा निघून जाईल.**


साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com



संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला अर्बन बँक रिझर्व्ह बँकेच्या निर्बंधातून मुक्त

## आर्थिक वर्षात ४.२४ कोटी निव्वळ नफा; बँकेस मिळाला ऑडिट वर्ग अ

सांगोला : सांगोला अर्बन बँकेची दि.३१ मार्च २०२५ अखेरची सांपत्तिक स्थिती अतिशय भक्कम व उल्लेखनिय असून या आर्थिक वर्षात बँकेच्या कर्ज पुरवठ्यामध्ये भरीव वाढ, एनपीए खात्याची चांगल्या प्रकारची वसुलीमुळे नेट एनपीएचे प्रमाण ४.९९%, भांडवल पर्याप्तता प्रमाणे १४.४०%, ढोबळ नफा रु.८.१४ कोटी विक्रमी नफा झाला असून निव्वळ नक्त नफा रु.४.२४ कोटी झालेला आहे. तसेच यावर्षी बँकेस ऑडिट वर्ग अ मिळाला असल्याची माहिती बँकेचे संस्थापक चेअरमन डॉ.प्रभाकर माळी व बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन सीए के.एस.माळी यांनी दिली.

सांगोला अर्बन बँकेच्या सांपत्तिक स्थितीचा दि.३१ मार्च २०२५ अखेरच्या प्रगतीचा लेखाजोखा घेऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने या आर्थिक वर्षात बँकेने केलेल्या उल्लेखनिय आर्थिक प्रगतीची दखल घेऊन बँकेस सुपरवायझरी अॅक्शन फ्रेमवर्क (एसएएफ) मधून बाहेर निघाल्याचे दि.३०/०६/२०२५ च्या पत्राद्वारे कळविले आहे. ही अतिशय आनंद देणारी बातमी व बाब आहे. गेल्या २ वर्षांपासून बँकेची थकबाकी / एनपीएत वाढ झाल्यामुळे ठेवीदारांना जास्त व्याजदर देता येत नव्हते. त्याच बरोबर वैयक्तिक कर्ज मर्यादा कमी केल्याने कर्ज वाटपामध्ये अडचणी येत होत्या. रिझर्व्ह बँकेच्या या सर्व अटी शर्तीच्या पूर्तता बँकेने केल्या आहेत. त्यामुळे या सर्व मर्यादा रिझर्व्ह बँकेने उठविल्यामुळे बँकेची आर्थिक प्रगतीची घोडदौड ही अंत्यत गतिमान होणार आहे.

गेल्या वर्षापासून बँकेने थकीत कर्जाच्या वसुलीसाठी सर्व थकबाकीदारांवर रितसर कायदेशिर कडक कारवाई करुन वसुली केल्याने थकबाकीचे प्रमाण कमी केले आहे. बँकेची वसुली झाल्याने बँकेंने उल्लेखनीय प्रगती साधल्याबद्दल रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी बँकेंचे संस्थापक चेअरमन, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन, सर्व संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी बँकेचा वर्धापन दिन असून त्यानिमीत्त ठेवीवर आकर्षक व्याजदरांच्या विविध योजना बँक जाहीर करणार आहे. तसेच कमी व्याजदरात वाहन कर्ज वितरीत करण्यासाठी विशेष योजना जाहिर करणार आहे. बँकेंनी आण्णासाहेब पाटील महामंडळ, ओबीसी महामंडळ अंतर्गत व्यवसायासाठी कर्ज वितरीत करणेसाठी योजना स्वीकारल्या असून त्याचे कर्ज वाटप सुरु आहे. बँकेच्या माध्यमातून बँकेंचे सभासद, सांगोला तालुक्यातील सामाजिक, सर्व स्तरातील व्यापारी, व्यावसायिक नोकरदार या सर्व सामान्य लोकांच्या अडी अडचणीत आर्थिक सहाय्य करुन त्यांच्या प्रगतीसाठी व उन्नतीसाठी आम्ही सदैव तयार आहोत. आपण त्याचा लाभ घ्यावा. यासाठी बँकेंस व शाखेस भेट देऊन बँकेच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन बँकेंचे संस्थापक चेअरमन डॉ.प्रभाकर माळी व बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन सीए के.एस. माळी यांनी केले आहे.

बँकेस नजीकच्या पुढील कालखंडामध्ये सुधारित डिजीटल बँकींगच्या सर्व सुविधा बँकेंमार्फत सुरु करण्यात येणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने मोबाईल बँकिंग, नेट बँकिंग, शासकिय लाभ योजना (नॅच) यांचा समावेश हा बँकेस युपीआय व आयएमपीएस सुविधांना रिझर्व्ह बँकेकडून मंजूरी प्राप्त होत आहे. या डिजीटल सेवा पुरविण्याऱ्या सोलापूर जिल्ह्यातील नागरी बँकांमध्ये सांगोला अर्बन बँकेला बहुमान प्राप्त होत आहे.

सांगोला अर्बन बँकेच्या सांपत्तिक स्थितीचा दि.३१ मार्च २०२५ अखेरच्या प्रगतीचा लेखाजोखा घेऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने या आर्थिक वर्षात बँकेने केलेल्या उल्लेखनिय आर्थिक प्रगतीची दखल घेऊन बँकेस सुपरवायझरी अॅक्शन फ्रेमवर्क (एसएएफ) मधून बाहेर निघाल्याचे दि.३०/०६/२०२५ च्या पत्राद्वारे कळविले आहे.

# प्रा.उत्तमराव घाटुळे यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्यानिमीत्त २१ जुलै रोजी गौरव ग्रंथाचे प्रकाशन



सांगोला : सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज मधील सेवानिवृत्त उपप्राचार्य व भ्रष्टाचार निर्मुलन चळवळीचे प्रणेते प्रा.उत्तमराव शामराव घाटुळे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिनाच्या निमीत्ताने सोमवार दिनांक २१ जुलै रोजी भव्य सत्कार समारंभ व गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळा आयोजित केला असल्याची माहिती अमृत महोत्सव समितीचे सदस्य व गौरव ग्रंथाचे संपादक प्रा.भाऊसाहेब पवार यानी दिली.

सदर सोहळ्याचे अध्यक्षस्थान सोलापुर विद्यापिठाचे माजी कुलगुरु प्रा.डॉ.बाबासाहेब बंडगर हे भुषविणार असुन एनसीएल पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ.प्रकाश वडगावकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबूराव गायकवाड़, सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके व ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक व माजी प्राचार्य डॉ.कृष्णा इंगोले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रा.भाऊसाहेब पवार संपादक असलेल्या उत्तम ते सर्वोत्तम या गौरव ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांचे हस्ते होणार आहे.. त्याचप्रमाणे धान्यतुला, ग्रंथतुला करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रा.अमित घाटुळे यानी दिली.

# मातंग समाजाच्या मागण्यांसाठी लहुजी पँथर सेनेचा २४ जुलैला विराट मोर्चा

सांगोला : लहुजी पँथर सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मातंग समाजाच्या विविध मागण्यांसाठी दिनांक २४ जुलै २०२५ रोजी गुरुवारी सांगोला तहसील कार्यालयावर विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषद घेण्यात आली.

या वेळी लहुजी पँथर सेनेचे राज्य प्रवक्ते नितीन रणदिवे यांनी पत्रकारांशी संवाद साधत मोर्चामागील उद्देश स्पष्ट केला. या पत्रकार परिषदेत नितीन रणदिवे यांनी समाजाच्या विविध मागण्यांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, पहिली मागणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत असून, दुसरी मागणी म्हणजे सुप्रीम कोर्टाने अ, ब, क वर्गीकरण केलेल्या आरक्षणाच्या अंमलबजावणीची आहे. ही मागणी समाजाच्या न्यायहक्काशी संबंधित असून त्यावर तातडीने निर्णय व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तिसऱ्या मागणीमध्ये सांगोला शहरात क्रांतीपिता लहुजी वस्ताद साळवे यांचे भव्य स्मारक उभारावे, अशी मागणी करण्यात आली आहे. चौथी महत्त्वाची मागणी म्हणजे सांगोला तालुक्यातील अवैध वाळू उपसा बंद करून, घरकुलधारकांना आवश्यकतेनुसार वाळू तात्काळ उपलब्ध करून द्यावी. या समस्येमुळे गोरगरिबांचे घरकुल स्वप्न अडचणीत आले आहे. पाचव्या मागणीचा उल्लेख करताना रणदिवे म्हणाले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्जासाठी असलेल्या जाचक अटी रद्द करण्यात याव्यात व युवकांना सहजपणे कर्ज उपलब्ध करून द्यावे. या सर्व मागण्यांसाठी लहुजी पँथर सेनेच्या नेतृत्वाखाली मातंग समाजाचा विराट मोर्चा सांगोला तहसील कार्यालयावर निघणार असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# शक्तिपीठ रद्द साठी नेतेमंडळींनी नेतृत्व हाती घ्यावे- अॅड.सचिन देशमुख



सांगोला : शक्तिपीठ रद्द होण्यासाठी व गावासाठी व जमिनीसाठी सर्व शेतकऱ्यांनी एकजूट दाखवून मोजणी थांबवावी व शक्तीपीठ रद्द करावा तसेच शक्तिपीठ बाधित शेतकऱ्यांनी आजी व माजी नेतेमंडळींना मतदान केले आहे परंतु त्यांचे शक्तिपीठाकडे दुर्लक्ष होत आहे तरी शक्तीपीठ रद्द होण्यासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील व भाजप जिल्हा अध्यक्ष चेतनसिंह केदार यांनी नेतृत्व हाती घ्यावे व बाधित शेतकऱ्यांच्या जमिनी वाचवून त्यांना न्याय द्यावा अशी एक मुखी मागणी शक्तीपीठ शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष सचिन देशमुख यांनी सांगोला तहसील कार्यालय समोर शेतकऱ्या पुढे बोलताना केली.

बाधित शेतकऱ्यांच्या जमिनी मोजणी अगोदर त्यांची भूमिका प्रशासनाने समजावून घ्यावी व यासाठी प्रशासनाने बाळाचा वापर करू नये व जर केला तर शेतकरी संघर्ष करतील यासाठी एकच जिद्द शक्तिपीठ रद्द अशा हात उंचावून शेतकऱ्यांनी घोषणा दिल्या व गरज नसलेला शक्तिपीठ रद्द करा, जमीन आमच्या मालकीची..नाही कुणाच्या बापाची अशा घोषणा यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी दिल्या. उपविभागीय अधिकारी भूसंपादन अधिकारी मंगळवेढा यांनी सांगोला तालुक्यातील ज्या बाधित शेतकऱ्यांनी हरकती घेतल्या अशा सर्व शेतकऱ्यांना सांगोला तहसील कार्यालय येथे हजर राहून खुलासा करण्याचे आवाहन केले होते व त्याप्रमाणे तालुक्यातील शेतकऱ्यांनी सुनावणीसाठी सकाळी १० वाजल्यापासून तहसील कचेरी येथे गर्दी केली होती व आपले लेखी म्हणणे भूसंपादन अधिकारी यांना सादर केले व यामध्ये जमीन गेल्यास उपजीविकेचे साधन राहणार नाही त्यानंतर कुटुंबाचे पालन पोषण कसे करणार व यासाठी शक्तीपीठ महामार्गास विरोध आहे व जमीन संपादित करू नये असा खुलासा सादर केला आहे.

संपादित जमिनीचा दर जाहीर करा व मान्य असेल तर शेतकऱ्यांची लेखी संमती घ्या व मगच भूसंपादन करा असे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अॅड.सचिन देशमुख यांनी भूसंपादन अधिकारी यांना यावेळी सांगितले तसेच अजून काही शेतकऱ्यांचे खुलाशी राहिले आहेत ते घ्या असेही यावेळी सांगितले. यावेळी शेतकरी वर्ग मोठ्या विधिमंडळाच्या अधिवेशनात आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, आमदार अभिजीत पाटील व आमदार जयंत पाटील, आमदार सतेज पाटील यांनी यांनी शक्तिपीठ महामार्गाबाबत आवाज उठवला त्याबद्दल सर्व शेतकऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत करा असे सचिन देशमुख यांनी सांगितल्यावर सर्वांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचा जयजयकार केला. संख्येने उपस्थित होता. तसेच शेतकरी संघर्ष समितीचे उपाध्यक्ष प्रकाश सोळशे, सचिव अॅड.शरद यादव उपस्थित होते. शेवटी उपाध्यक्ष दादासो वाघमोडे यांनी आभार मानले.

# शक्तीपीठ महामार्ग बाधीत शेतकऱ्यांच्या बाजुने शेतकरी कामगार पक्ष-आ.बाबासाहेब देशमुख

## एकरी ४ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याची विधानसभा अधिवेशनात केली मागणी



सांगोला : शक्तीपीठ महामार्गामुळे राज्यातील ५० हजार शेतकरी बाधीत होत आहेत..या महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध असुन यामुळे शेतकऱ्यांच्या पुढील पिढ्यांचे नुकसान होणार आहे.शक्तीपीठ महामार्ग बाधीत शेतकऱ्यांच्या बाजुने शेतकरी कामगार पक्ष असून जर सरकारला हा महामार्ग विरोध असुनही काढायचा असेल तर बाधीत शेतकऱ्यांना एकरी एकरी ४ कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी सांगोला विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार डॉ.भाई. बाबासाहेब देशमुख यांनी केलेली आहे.

शक्तीपीठ महामार्ग बाधीत शेतकऱ्यांच्या बाजुने शेतकरी कामगार पक्ष असुन बाधीत शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी चालु असलेल्या आंदोलनामध्ये शेतकरी कामगार पक्षाची भुमिका महत्वाची आहे. शेतकरी कामगार पक्षाने कवठेमहांकाळ येथील पश्चीम महाराष्ट्र विभागीय मेळाव्यात भाई जयंत पाटील, आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख, भाई.बाळाराम पाटील, भाई संपतबापु पाटील, तसेच दिगंबर कांबळे यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांच्या बाजुने एकमुखी ठराव करुन राज्य सरकारला पाठवलेला आहे. तसेच शेकापक्षाचे आमदार डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांनी शक्तीपीठ मार्गाचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला.. शक्ती पिठ महामार्गामुळे बाधीत होणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळाला पाहीजे... आपल्या सोलापुर जिल्ह्यातुन गेलेल्या सुरत चेन्नई महामार्ग बाधीत शेतकऱ्यांना एका गुंठ्याला ६० हजार रुपये देण्याचा निर्णय या अगोदर झालेला आहे..मात्र या शक्तीपिठ बाधीत शेतकऱ्यांना मात्र एकरी ४ कोटी रुपये प्रमाणे मोबदला मिळावा ही शेतकरी कामगार पक्षाची भावना व भुमीका आहे.

शेकापक्षाला या विषयात राजकारण करायचे गरज नाही. आमचा शेतकरी कामगार पक्ष कायम शेतकरी, कष्टकरी, कामगार , दलित, वंचीत घटकांच्या सोबत असल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगितल्याची माहीती प्रसिध्दी प्रमुख भाई चंद्रकांत सरतापे यांनी दिली.

# सूर्योदयचा प्रत्येक उपक्रम समाजाला दिशा देणारा- विनोदवीर अशोक देशमुख

## जीवनगौरव पुरस्कार वितरण आणि स्नेहसंवाद मेळावा दिमाखात संपन्न



सांगोला : सूर्योदय उद्योग समूह संचलित सूर्योदय फाउंडेशनच्या माध्यमातून आजवर घेतलेले सर्वच उपक्रम अत्यंत कौतुकास्पद, राष्ट्रहिताचे आणि समाजाला दिशा देणारे असल्याचे गौरवोद्गार पुणे येथील सुप्रसिद्ध विनोदी वक्ते अशोक देशमुख यांनी काढले. अनिलभाऊ झंवले आणि त्यांच्या टीमने इथे मोठ्या संख्येने ज्येष्ठ व्यक्तींना एकत्र बोलावून माझ्यासारख्या एका ज्येष्ठ व्यक्तीला त्यांच्यात मिसळण्याची संधी दिली असे सांगत छोट्या छोट्या गोष्टीतून विनोदाची निर्मिती करत त्याचबरोबर आरोग्यासाठी काही महत्वाच्या टिप्स देत उपस्थितांना सुमारे तासभर त्यांनी मंत्रमुग्ध केले. यावेळी सर्व उपस्थितांची हसता हसता पुरेवाट झाली. उपस्थित सर्वांनी यावेळी नृत्यांमध्ये देखील सहभाग घेत कार्यक्रमाला प्रचंड दाद दिली.

सुरुवातीला सूर्योदय फाउंडेशनचे अध्यक्ष अनिलभाऊ झंवले यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये एलकेपी मल्टीस्टेट व सूर्योदय अर्बन यांची वाटचाल सांगत सूर्योदयने आजपर्यंत केलेल्या सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. विविध क्षेत्रातील उत्तुंग कार्य असलेल्या तपस्वींना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्याचे भाग्य आम्हाला लाभत असून समाजातील प्रत्येक घटकांसाठी मनापासून काम करण्याची सूर्योदयची परंपरा आहे. आपल्यासारख्या थोरामोठ्यांच्या आशीर्वादावरच सूर्योदय उद्योग समूह आपली यशस्वी वाटचाल करत असल्याचेही त्यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले.

यावेळी अध्यात्मिक क्षेत्रातील जाणकार व्यक्तिमत्व ज्येष्ठ निरूपणकार सुभाष लऊळकर सर, मेडशिंगी भूषण डॉ.मच्छिंद्र सोनलकर, आपुलकी प्रतिष्ठानचे प्रा.राजेंद्र यादव इत्यादी मान्यवरांनी आपले मत व्यक्त करताना सूर्योदयने फक्त आपला उद्योग आणि व्यवसाय एवढीच संकुचित वृत्ती न ठेवता मोठ्या प्रमाणावर सामाजिक बांधिलकी जपली असून आपला हा सर्वसमावेशक आणि व्यापक विचारच तुम्हाला उत्तरोत्तर आणखी यशाकडे घेऊन जाणार असल्याचे सांगितले. सूर्योदय फाउंडेशनचे उपाध्यक्ष जगन्नाथ भगत यांनीही यावेळी बोलताना बचत व योग्य गुंतवणुकीचे महत्त्व सांगत सूर्योदय ग्रुप बद्दल विशेषतः सूर्योदय फर्निचर मॉल, वस्त्रनिकेतन आणि बझार बद्दल अधिक माहिती सांगितली. यावेळी मंचावर सूर्योदय दूध विभागाचे चेअरमन डॉ.बंडोपंत लवटे आणि एल.के.पी.मल्टीस्टेटचे व्हा.चेअरमन सुभाष दिघे गुरुजी उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरिकांच्या या स्नेहसंवाद मेळाव्यात सांगोला शहर आणि तालुक्यातील शिक्षण, शेती, संरक्षण, उद्योग व व्यापार, पत्रकारिता, सामाजिक कार्य, विविध संघटना अशा अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य असलेल्या ज्येष्ठ व्यक्तींना मान्यवरांच्या शुभहस्ते जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सूर्योदय फाउंडेशनने दिलेल्या या पुरस्कारामुळे आम्हाला आमच्या क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी अधिकचे प्रोत्साहन मिळाले असून आमची जबाबदारी आणखी वाढली असल्याच्या भावना यावेळी सर्वच पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी बोलून दाखवल्या. पावसाचे वातावरण असतानाही महिलांसह सर्वांची मोठी उपस्थिती, सूर्योदयचे निरपेक्ष कार्य, कार्यक्रमाचे नेटके नियोजन आणि पुरस्कारासाठी योग्य व्यक्तींची निवड यामुळे आजचा कार्यक्रम खूपच दर्जेदार झाला असल्याचे यावेळी अनेकांनी बोलून दाखवले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात रक्तदान शिबिराचे आयोजन - जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत



सांगोला : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलै रोजी सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा २२ जुलै रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मंडळात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी प्रत्येक मंडलात बैठका घेऊन नियोजन केले आहे. भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, विविध मोर्चा, आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केले आहे.

# डॉ.कृष्णा इंगोले यांची कथा सोलापूर विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमात



सांगोला : येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ.कृष्णा इंगोले यांची कथा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठात बी.ए.भाग दोन मराठी विषयासाठी स्विकारण्यात आलेली आहे.

सोलापूर विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळांनी तयार केलेला अभ्यासक्रम नुकताच विद्यापीठाने जाहीर केला आहे. त्यात या कथेचा उल्लेख आढळतो. गो बॅक टू पॅव्हेलियन असे त्या कथेचे नाव आहे. शेतकऱ्याचा मुलगा प्राध्यापक होतो आणि पुढच्या पिढीत प्राध्यापकाचा मुलगा पुन्हा शेतकरी होतो. यात प्रगती की अधोगती? यावर ही कथा प्रकाश टाकते. डॉ. कृष्णा इंगोले यांची आज अखेर वीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यात कथासंग्रह, ललितलेख संग्रह, व्यक्तीचरित्र संग्रह, समीक्षा, लोकसाहित्य, आणि संशोधन या विषयावरील ग्रंथ आहेत यापूर्वी शिवाजी आणि सोलापूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात त्यांचे ग्रंथ संदर्भ ग्रंथ म्हणून समाविष्ट केलेले आहेत.

प्राध्यापक असताना त्यांनी विद्यापीठाच्या अनेक समित्यावर काम केले आहे. सिनेट आणि विद्यापरिषदेचे ते सदस्य होते. मराठी अभ्यास मंडळाचे ते पाच वर्षे अध्यक्ष होते विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात साहित्याची निवड होणे हे लेखकाच्या दृष्टीने प्रतिष्ठेचे मानले जाते. डॉ. कृष्णा इंगोले यांचे शैक्षणिक आणि साहित्यिक वर्तुळा मधून अभिनंदन होत आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्या नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता